# ‘आई’



फाटकी माझी विजार शिवत, तेव्हा जरी रडलीस तू
भल्या भल्यांना टाकले मागे, पण मागे नाही पडलीस तू
पाठीला जरी पोट लागले, ओढ ना माझी सोडलीस तू
वेळेवर शिळी भाकरी, गोड करून तोडलीस तू
मिळाला नसता मान मजला, जर पिळला असता कान तू
 कोण म्हणेल अडाणी तुजला, ठेविले दूरदृष्टीने भान तू
पिलासम भरविण्यामजला, गाळला रात्रंदिन घाम तू
आयुष्यात नाही भोगला, मजस्तव आराम तू
तुझ्यामुळे मिळाले ज्ञान मजला, त्या पुस्तकाचे पान तू
अशी आई जन्मोजन्मी लाभो, दे असे मज वरदान तू
वृक्षागत दाया देते, कुटुंबाचा अभिमान तू
जाऊ कशाला मंदिरी, साक्षात जर भगवान तू
झिजता झिजता तिर्थक्षेत्री, माझी चारही धाम तू
मला जीवनी काही नको, माझे पंचप्राण तू
तु असता वाण कसली, नवरत्नाची खाण तू
डोळ्यात माझ्या सदा तस्वीर, जाऊ नको आता लांब तू
तुझ्या ऋणीची फेड करु दे आणखी थोडी थांब तू....

संदेश चव्हाण
द्वितीय वर्ष वाणिज्य

